
# ३) वसलसुत्त

**प्रस्तावना**

वसलसुत्त हे सुत्तनिपातातील महत्त्वाचे सुत्त आहे. यामध्ये वसल कुणास म्हणावे याविषयी सांगितलेले आहे. एकदा तथागत बुद्ध श्रावस्तीमधील अनाथपिंडिकाच्या जेतवन आरामामध्ये विहार करीत होते. सकाळच्या वेळी ते भिक्षाटन करीत असतांना श्रावस्ती नगरीत राहणाऱ्या अग्गिक भारद्वाजाच्या घराजवळ जाऊन उभे राहिले. अग्गिक भारद्वाजाने तथागतांना दुरूनच येतांना पाहून तिरस्कृत नजरेने म्हटले, हे मुण्डका! हे श्रमण! हे वसल! तिथेच थांब, पुढे येऊ नको. तेव्हा तथागत त्याला शांतपणे म्हणाले, हे ब्राह्मण! वसल कुणाला म्हणावे? किंवा माणुस कशामुळे वसल समजला जातो, हे तू जाणतोस काय? अग्गिक भारद्वाज ब्राह्मणाने नम्रपणे अज्ञान मान्य करून तथागतांना त्या संबंधी उपदेश करण्याची विनंती केली. तेव्हा तथागतांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमध्ये वसल कुणास म्हणावे? याविषयी त्या अग्गिक भारद्वाज ब्राह्मणाला उपदेश दिला.

**'' माणसा–माणसांत कोणत्याही प्रकारचा भेद न करता लोकांच्या कल्याणासाठी समाजव्यवस्थेची निर्मिती करणे.''**



कोधनो उपनाही च, पापमक्खी च यो नरो।
विपन्नदिट्ठी मायावी, तं जञ्ञा वसलो इति।।१।।

गामे वा यदि वा, रञ्ञे यं परेसं ममायितं।
थेय्या अदिन्नं आदियति, तं जञ्ञा वसलो इति।।२।।

यो हवे इणमादाय, चुज्जमानो पलायति।
न ही ते इणमत्थी'ति, तं जञ्ञा वसलो इति।।३।।

यो अत्तहेतु परहेतु, धनहेतु च यो नरो ।
सक्खिपुट्ठो मुसा बुति, तं जञ्ञा वसलो इति।।४।।

यो मातरं वा पितरं वा, जिण्णकं गतयोब्बनं।
पहू सन्तो न भरति, तं जञ्ञा वसलो इति।।५।।

यो अत्थं पुच्छितो, सन्तो अनत्थमनुसासति ।
पटिच्छन्नेनं मन्ते'ति तं, जञ्ञा वसलो इति।।६।।

यो वे परकुलं गन्त्वा, भुत्वान सुचिभोजनं ।
आगतं न पटिपूजेति, तं जञ्ञा वसलो इति।।७।।

यो बाह्मणं वा समणं वा, अञ्ञं वा'पि वनिब्बकं।
मुसावादेन वञ्चेति, तं जञ्ञा वसलो इति।।८।।

यो बाह्मणं वा समणं वा, भत्तकाले उपट्ठिते ।
रोसेति वाचा न च देति, तं जञ्ञा वसलो इति।।९।।

न जच्चा वसलो होति, न जच्चा होति बाह्मणो।
कम्मुना वसलो होति, कम्मुना होति बाह्मणो'ति।।१०।।

**(संदर्भ– सुत्तनिपात)**

## शब्दार्थ

**वसलो (पु)–** नीच
**कोधनो (वि.)–** रागीट, क्रोधी
**उपनाही (वि.)–** वैरी
**पापमक्खी (वि.)–** पापात बुडालेला
**विपन्नदिट्ठी (वि.)–** ज्याचा दृष्टिकोन किंवा मत चुकीचे आहे असा
**ममायितं (नपु.)–** माझे, माझे(करतो)
**इण (नपु.)–** ऋण, कर्ज
**सक्खिपुट्ठो (वि.)–** साक्ष काढलेला
**जिण्णकं (वि.) –** म्हातारा
**गतयोब्बनं (वि.)–** ज्याचे यौवन, तारुण्य नष्ट झाले आहे असा म्हातारा
**पहु (वि.)–** ताकदवान, समर्थ
**वनिब्बकं (पु.)–** भिकारी
**जच्चा (स्त्री.)–** जन्माने

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) वसलसुत्तात तथागतांनी कुणाला उपदेश दिला आहे?
२) वसल व्यक्ती दुसऱ्यांच्या संपत्तीचे काय करतो?
३) वसल व्यक्तीला दिलेले कर्ज मागीतल्यावर काय म्हणून पलायन करतो?
४) स्वतःच्या हितासाठी खोटी साक्ष कोण देतो?
५) वसल व्यक्ती समर्थ असुनही कोणाचे पालणपोषण करीत नाही?
६) वसल व्यक्ती दुसऱ्यांच्या घरी जाऊन काय करतो?
७) जन्माने कोण होत नाही?

८) दुसरा व्यक्ती आपल्या घरी आल्यावर वसल काय करीत नाही?
९) कर्माने कोण होते?

**२. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.**

१) अक्कोधनो अपनाहि च पापमक्खीच यो नरो।
२) यो हवे इणमादाय चुज्जमानो पलायति।
३) यो अत्थं पुच्छिन्तो सन्तो अनत्थमनुसासति।
४) मुसावादेन वञ्चेति तं जञ्ञा वसलो इति।
५) रोसेति वाचा न च दोन्ति,तं जञ्ञा वसलो इति।

**३. खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करुन उत्तरे लिहा.**

१) विपन्नदिट्ठि................ तं जञ्ञा वसलो इति। (अमायावी/मायावी) (योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.)
२) यो.............. पुच्छितो सन्तो अनत्थमनुसासति। (अनत्थं/अत्थं) (योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.)
३) यो ब्राह्मणं वा समणं वा................ उपट्ठिते। (मत्तकाले/भत्तकाले) (योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.)
४) जिण्णकं (माध्यम भाषेत अर्थ लिहा)
५) सुचिभोजनं (माध्यम भाषेत अर्थ लिहा)
६) विपन्नदिट्ठी (माध्यम भाषेत अर्थ लिहा)
७) ब्राह्मणं समणं (समास ओळखा)
८) मातरं पितरं (समास ओळखा)

**४. संधी ओळखा.**

१) अनत्थं + अनुसासति
२) इण + आदाय
३) एतद + अवोच
४) न + अत्थि
५) वसलो + इति

**५. खालील शब्दांचे रूपे ओळखा.**

१) पलायति
२) भुत्वान
३) रोसेति
४) इणमादाय
५) भरति


**६. खालील पालि शब्दांचा वाक्यात उपयोग करा.**

१) न
२) च
३) यो
४) वा
५) तं
६) आगतं

**७. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) न जच्चा वसलो होति | अ)कम्मुना होति ब्राह्मणो। |
| २) कम्मुना वसलो होति | ब) न जच्चा होति ब्राह्मणो। |
| ३) यो ब्राह्मणं वा समणं वा वनिब्बकं | क) मुसावादेन वञ्चेति। |
| | ड) रोसेति वाचा न च देति। |

**८. जाळरेखाचित्र पूर्ण करा.**




**९. दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर लिहा.**

वसल (वाईट) कुणाला म्हणावे? या विषयीचा तथागत बुद्धाचा उपदेश तुमच्या शब्दांत लिहा.

☆☆☆